
Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates




Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

( श्री टोडरमल ग्रंथमालेचे बावीसावे पुष्प )

# बालबोध पाठमाला भाग ३

( श्री वीतराग विज्ञान विद्यापीठ परीक्षा बोर्डाद्वारे निर्धारित )

[ मूळ हिंदीचा मराठी अनुवाद ]

: लेखक व संपादक :

डॉ. हुकमचन्द भारिल्ल

शास्त्री, न्यायतीर्थ, साहित्यरत्न एम्. ए., पीएच्. डी.

संयुक्तमंत्री, श्री टोडरमल स्मारक भवन, जयपूर.

प्रकाशक :

पं. टोडरमल स्मारक ट्रस्ट

ए – ४, बापूनगर, जयपुर– ३०२ ०१५

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

**मराठी :**

| | | |
|---|---|---|
| **प्रथम तीन सस्करण** | : | १५ हजार २०० |
| **चतुर्थ संस्करण** | : | ५ हजार |
| (१ मई १९९५) | | |
| **योग** | : | २० हजार २०० |

**हिन्दी :**

| | | |
|---|---|---|
| **प्रथम सत्रह संस्करण** | : | १ लाख २७ हजार १०० |

**गुजराती :**

| | | |
|---|---|---|
| **प्रथम तीन संस्करण** | : | १३ हजार |

**अंग्रेजी :**

| | | |
|---|---|---|
| **प्रथम संस्करण** | : | ५ हजार |

**कन्नड़ :**

| | | |
|---|---|---|
| **प्रथम दो संस्करण** | : | ४ हजार |

**तमिल :**

| | | |
|---|---|---|
| **प्रथम संस्करण** | : | १ हजार ५०० |

**बंगला :**

| | | |
|---|---|---|
| **प्रथम संस्करण** | : | १ हजार |
| **महायोग** | : | १ लाख ७१ हजार ८०० |

**मूल्य : तीन रुपया**

मुद्रक : ग्राफिक आफसैट प्रिन्टर्स
जयपुर, फोन: 568700

## Thanks & Our Request

This shastra has been kindly donated by Dakshaben Sanghvi, Geneva, Switzerland who has paid for it to be "electronised" and made available on the internet.

Our request to you:

1) Great care has been taken to ensure this electronic version of BalbodhPathmala – Part 3 (Marathi) is a faithful copy of the paper version. However if you find any errors please inform us on rajesh@AtmaDharma.com so that we can make this beautiful work even more accurate.

2) Keep checking the version number of the on-line shastra so that if corrections have been made you can replace your copy with the corrected one.

## Version History

| Version Number | Date | Changes |
| --- | --- | --- |
| 001 | 23 May 2008 | First electronic version |

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# विषय सूची



| क्रम | पाठाचे नाव | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | देव–दर्शन | ४ |
| २ | पंच परमेष्ठी | ८ |
| ३ | श्रावकाचे आठ मूलगुण | १३ |
| ४ | इन्द्रिय | १६ |
| ५ | सदाचार | २० |
| ६ | द्रव्य–गुण–पर्याय | २३ |
| ७ | भगवान नेमिनाथ | २८ |
| ८ | जिनवाणी स्तुती | ३१ |



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# पाठ पहिला

# देव–दर्शन

**अति पुण्य उदय मम आया, प्रभु तुमरा दर्शन पाया।**
**अब तक तुमको बिन जाने, दुख पाये निज गुण हाने ॥**
पाये अनंते दुःख अब तक, जगत को निज जानकर।
सर्वज्ञ भाषित जगत हितकर, धर्म नहिं पहिचान कर ॥
भव बंधकारक सुखप्रहारक, विषय में सुख मानकर
निज पर विवेचक ज्ञानमय, सुखनिधी–सुधा नहिं पान कर ॥१॥

**तव पद मम उर में आये, लखि कुमति विमोह पलाये।**
**निज ज्ञान कला उर जागी, रुचि पूर्ण स्वहित में लागी ॥**
रुचि लगी हित में आत्म के, सतसंग में अब मन लगा।
मन में हुई अब भावना, तव भक्ति में जाऊँ रँगा ॥
प्रिय वचन की हो टेव, गुणिगण गान में ही चित पगै।
शुभ शास्त्र का नित हो मनन, मन दोष वादनतैं भगै ॥२॥



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# सारांश

हे वीतराग सर्वज्ञ प्रभो ! आज माझा महान् पुण्याचा उदय आहे. मला आपले दर्शन झाले. आजपर्यन्त मी आपणाला जाणले नाही व स्वतःच्या गुणांना ओळखले नाही त्यामुळे अनंत दुःख भोगले !

प्रभो ! मी या संसाराला आपले समजलो. आपण सर्वज्ञ भगवंतांनी सांगितलेल्या व आत्म्याचे कल्याण करणाऱ्या वीतराग धर्माला ओळखले नाही. संसार वाढविणाऱ्या व खऱ्या सुखाचा नाश करणाऱ्या पंचेंद्रियाच्या विषयात सुख मानले. सुखाचा निधी असलेल्या स्वपर भेद–विज्ञानरूप अमृताचे पान केले नाही म्हणून आजपर्यन्त निरंतर अनंत दुःखाला प्राप्त झालो ! ।।१।।

भगवन् ! आज आपले चरणकमल माझ्या हृदयात विराजमान झाले आहेत, हे पाहून मिथ्याबुद्धी आणि मोह (मिथ्यात्व) पळून गेले आहेत. आत्मज्ञानाची कला आता माझ्या हृदयात जागृत झाली आहे. आत्महित करण्याची स्वाभाविक रुची मला लागली आहे. सत्समागमामध्ये माझे मन रमू लागले आहे. आणि माझ्या मनात ही भावना जागृत झाली आहे की, आता आपल्या भक्तीच्या रसरंगात रंगून जावे.

ज्यावेळी मी आत्मस्वरूपात लीन राहू शकणार नाही त्यावेळी भगवन् मजकडून मुखावाटे बोलले जाणारे वचन नेहमी आत्महित करणारे प्रिय असेच बोलले जावो ! माझे मन गुणीजनांचे गुणगान करण्यात रमून जावो ! माझ्याकडून आत्महिताचा उपदेश देणाऱ्या शास्त्रांचे नित्य मनन होवो ! माझे मन दोषांच्या चिंतनापासून आणि माझी वाणी इतरांच्या दोष–कथनापासून दूर राहो. ।।२।।



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

**कब समता उर में लाकर, द्वादश अनुप्रेक्षा भाकर।**
**ममतामय भूत भगाकर, मुनिव्रत धारूँ वन जाकर ॥**
धरकर दिगंबर रूप कब, अठ–बीस गुण पालन करूँ।
दो–बीस परिषह सह सदा, शुभ धर्म दश धारन करूँ ॥
तप तपूँ द्वादश विधि सुखद नित, बंध आश्रव परिहरूँ।
अरु रोकि नूतन कर्म संचित, कर्म रिपुकों निर्जरूँ ॥३॥

**कब धन्य सुअवसर पाऊँ, जब निज में ही रम जाऊँ।**
**कर्तादिक भेद मिटाऊँ, रागादिक दूर भगाऊँ ॥**
कर दूर रागादिक निरंतर, आतम को निर्मल करूँ।
बल ज्ञान दर्शन सुख अतुल, लहि चरित क्षायिक आचरूँ ॥
आनन्दकन्द जिनेन्द्र बन, उपदेश को नित उच्चरूँ।
आवै 'अमर' कब सुखद दिन, जब दु:खद भवसागर तरूँ ॥४॥

---

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

भगवन् ! माझ्या मनात यावेळी सहजच ह्या भावना उत्पन्न होत आहेत.– "तो दिवस केव्हा येईल की जेव्हा मी हृदयात समता भाव धारण करून बारा भावनांचे चिंतन करेन व ममता-रूपी भुताला गाडून वनात जाईन आणि मुनीदीक्षा धारण करेन, तो दिवस लवकर येवो की, जेव्हा मी दिगम्बर वेष धारण केलेला असावा, अठ्ठावीस मूलगुणांचा स्वीकार केलेला असावा, बावीस परिषहांवर विजय प्राप्त करावा आणि दशलक्षण धर्माची धारणा केलेली असावी, सुख देणाऱ्या बारा प्रकारच्या तपाचे आचरण केलेले असावे आणि संपूर्ण आस्रव भाव व बंध भावांचा त्याग झालेला असावा, नवीन कर्मे रोकली गेलेली असावीत व संचित कर्मांची निर्जरा होत असावी." ।।३।।

परमात्मन् ! ती मंगल वेला लवकर येवो की, जेव्हा मी आत्मस्वरूपात लीन असेन. हा कर्ता हे कर्म अशा भेदांचाही अभाव झालेला असेल ! रागद्वेष दूर होऊन आत्मा निर्मल बन-लेला असेल. आत्म्यामध्ये क्षायिक चारित्र प्रगट होऊन मी अनंत-दर्शन–अनंतज्ञान–अनंतसुख आणि अनंत वीर्यरूप झालेला असेन. आनंदकंद जिनेंद्रांच्या परमपदाची प्राप्तीही झाली असेल ! भगवन् ! मला तो दिवस शीघ्र प्राप्त होवो, जेव्हा माझा हा अत्यंत दुःखद भवसागर पार होईल व मला अमरपदाची प्राप्ती होईल ! ।।४।।

भगवंताच्या वरील स्तुतीमध्ये देवदर्शनापासून तो साक्षात् भगवान बनण्यापर्यंतची केवळ भावनाच आली असे नाही तर भक्तापासून भगवान् बनण्याचा एकप्रकारे सर्व विधीच आला आहे.

**प्रश्न—**

१. वरील स्तुतीमधील कोणताही एक श्लोक जो तुम्हाला आवडला असेल, तो अर्थासहित लिहा. तसेच तो आवडण्याचे कारणही द्या.

---



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

# पाठ दुसरा

# पंच परमेष्ठी

**णमो *अरिहंताणं, णमो सिद्धाणं णमो आइरियाणं ।**
**णमो उवज्झायाणं, णमो लोए सव्व साहूणं ॥**

( षट्खंडागम गाथा--१ )

हा पंच नमस्कार मंत्र आहे. यामध्ये सर्वप्रथम पूर्ण वीतरागी व पूर्ण ज्ञानी अरहंत भगवंतांना आणि सिद्ध भगवंतांना नमस्कार केला आहे. त्यानंतर वीतराग मार्गाने जाणाऱ्या मुनीराजांना नमस्कार केला आहे, ज्यामध्ये आचार्य मुनीराज, उपाध्याय मुनीराज आणि सामान्य मुनीराज हे सर्व येतात.

अरहंत, सिद्ध, आचार्य उपाध्याय आणि साधु यांना पंचपरमेष्ठी म्हणतात. अरहंतादिक पद परमपद आहेत आणि हे परमपदामध्ये स्थित आहेत म्हणून यांना परमेष्ठी म्हणतात.

---


* धवल ग्रंथात 'अरिहंताणं' व 'अरहंताणं' दोन्ही शब्द पाहावयास मिळतात.

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

परमेष्ठी पाच प्रकारचे असल्यामुळे त्यांना पंच परमेष्ठी म्हणतात.

## अरहंत

जे गृहस्थपणा सोडून मुनिधर्म अंगीकार करून, निज स्वभाव साधनेद्वारे चार घाति कर्मांचा क्षय करून अनंत चतुष्टयरूप (अनंतदर्शन, अनंतज्ञान, अनंतसुख व अनंतवीर्य) विराजमान झाले आहेत ते 'अरहंत परमेष्ठी' होत.



अरहंत परमेष्ठी

शास्त्रामध्ये अरहंतांच्या ४६ गुणांचे (विशेषांचे) वर्णन आहे. त्यापैकी काही (विशेष) तर शरीराशी संबंधित आहेत, काही आत्म्याशी संबंधित आहेत. एकूण ४६ गुणांपैकी १० तर जन्माचे अतिशय (विशेष) आहेत, जे शरीराशी संबंधित आहेत.

१० केवलज्ञानाचे अतिशय आहेत ते देखील बाह्य पुण्य सामुग्रीशी संबंधित आहेत, तसेच १४ देवकृत अतिशय तर स्पष्टपणे देवांकडून केले जाणारे आहेत; व हे सर्व अतिशय तीर्थंकर अरहंतांनाच असतात, सर्व अरहंतांना नसतात.


आठ प्रातिहार्य सुद्धा बाह्य विभूती आहेत. परंतु, अनंत चतुष्टय मात्र आत्म्याशी संबंधित आहेत. म्हणून ते प्रत्येक अरहंतांना असतात. निश्चयाने (वास्तविक) हेच चार अरहंतांचे गुण आहेत.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

## सिद्ध



सिद्ध परमेष्ठी

जे गृहस्थपणा सोडून, मुनिधर्म साधनेद्वारे चार घाति-कर्मांचा नाश झाल्यावर, अनंत चतुष्टय प्रगट करून, काही काळानंतर अघाति-कर्मांचा देखील नाश झाल्यावर समस्त अन्य द्रव्यांचा संबंध सुटल्यावर पूर्ण मुक्त झाले आहेत; लोकाच्या अग्रभागी, अन्तिम शरीराहून किंचित् न्यून (कमी) पुरुषाकार विराजमान झाले आहेत; ज्यांचा द्रव्यकर्म, भावकर्म आणि नोकर्मांचा अभाव झाल्यामुळे समस्त आत्मिक गुण प्रगट झाले आहेत; ते 'सिद्ध परमेष्ठी' होत.

त्यांचे मुख्यपणे आठ गुण सांगितले आहेत–

सम्यक्त्व बोधदर्शन अव्याबाधत्व अगुरुलघुसाचे ।
सूक्ष्माऽवगाहना बल अनंत गुण आठ असती सिद्धांचे ।।

१. क्षायिक सम्यक्त्व, २.अनंतज्ञान, ३.अनंतदर्शन,४. अव्याबाधत्व, ५. अगुरुलघुत्व, ६. सूक्ष्मत्व, ७ अवगाहनत्व व ८. अनंतवीर्य.

## आचार्य उपाध्याय आणि साधुंचे सामान्य स्वरुप

आचार्य, उपाध्याय आणि साधु सामान्यपणे साधुमध्येच येतात. जे विरक्त होऊन समस्त परिग्रहांचा त्याग करून, शुद्धोपयोगरूप मुनिधर्म अंगिकार करतात. अंतरंगात शुद्धोपयोगा-द्वारे आपल्या आत्म्याला आत्मरूप अनुभवतात; आपला उपयोग इकडे तिकडे फार फिरवीत नाहीत, ज्यांना कदाचित् मंदरागाच्या उदयाने शुभोपयोग देखील असतो, परंतु त्याला देखील हेय



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

मानतात, तीव्र कषायांचा अभाव झालेला असल्यामुळे अशुभोपयोगाचे अस्तित्वच नसते. असे मुनीश्वरच खरे साधु आहेत.

## आचार्य

जे साधु सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान, सम्यक् चारित्र यांच्या विशेषतेने प्रमुखपदाला प्राप्त होऊन मुनिसंघाचे नायक आहेत तसेच मुख्यपणे तर निर्विकल्प स्वरूपाचरणातच मग्न राहतात, परंतु कधी कधी रागांशाच्या उदयाने



आचार्य परमेष्ठी

करुणाबुद्धी उत्पन्न झाली तर धर्माच्या लाभाची इच्छा असलेल्या (धर्मलोभी) अन्य जीवांना धर्मोपदेश देतात. दीक्षा घेणाऱ्यास योग्य वाटल्यास दीक्षा देतात, आपले दोष प्रगट करणाऱ्यास प्रायश्चित्त विधीने शुद्ध करतात—असे आचरण करणारे आणि करविणारे जे साधु आहेत त्यांना आचार्य परमेष्ठी ' म्हणतात.

## उपाध्याय

जे साधू अनेक जैन शास्त्रांचे ज्ञाता होऊन मुनिसंघामध्ये शिकणे व शिकविण्याचे अधिकारी झालेले असतात, तसेच ज्यांची समस्त शास्त्रांच्या सारस्वरूप अशा आत्मस्वरूपात एकाग्रता आहे व विशेषत: त्यातच जे लीन राहतात; कधी कधी कषायांच्या



उपाध्याय परमेष्ठी

अत्यंत मंद उदयाने जर उपयोग तेथे स्थिर न राहिला तर शास्त्रांचा स्वतः स्वाध्याय करतात व इतरांना शिकवितात ते 'उपाध्याय परमेष्ठी' होत. हे मुख्यतः द्वादशांगाचे पाठी असतात.

## साधु



साधु परमेष्ठी

आचार्य उपाध्याय यांना सोडून इतर सर्व जे मुनी मुनि-धर्मांचे धारक आहेत आणि आत्मस्वभावाची साधना कर-तात, बाह्यतः २८ मूलगुणांचे अखंडपणे पालन करतात, सर्व प्रकारच्या आरंभ तसेच अंतरंग व बहिरंग परिग्रहांनी रहित असतात, सदा ज्ञान-ध्यानात लीन राहतात, सांसारिक प्रपंचापासून सदा दूर असतात. ते 'साधु-परमेष्ठी' होत.

याप्रमाणे पाचही परमेष्ठींचे स्वरूप वीतराग-विज्ञानमय आहे. म्हणून ते पूज्य आहेत.

**प्रश्न—**

१. पंचपरमेष्ठी कोणास म्हणतात!

२. अरहंत आणि सिद्ध परमेष्ठींचे स्वरूप सांगा, तसेच त्यांच्या स्वरूपातील भेद स्पष्ट करा.

३. सामान्यपणे साधुंचे स्वरूप सांगून आचार्य साधु आणि उपाध्याय साधु यांचे स्वरूप सांगा.

---

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# पाठ तिसरा

## श्रावकाचे आठ मूलगुण

प्रबोध – काय सुबोध ? या बाटलीमध्ये काय आहे ?

सुबोध – मध.

प्रबोध – काय ? मध ! !

सुबोध – वैद्यांनी औषध दिले होते आणि सांगितले होते की, मध अथवा साखरेच्या पाकामधून घे. म्हणून बाजारातून मध आणला आहे.

प्रबोध – तर काय? तुम्ही मध खाता ? तुम्हाला माहीत नाही काय ? मध हा तर अत्यंत अपवित्र पदार्थ आहे. मध-माशांचा मल आहे. आणि हा पुष्कळशा त्रस–जीवांचा घात होऊन तयार होतो. मध आपण लोकांनी केव्हाही खावयास नको !

सुबोध – दादा ! आपण तर सामान्य श्रावक आहोत, कोणी व्रती थोडेच आहोत !

प्रबोध – सामान्य श्रावक देखील अष्ट मूलगुणांचा धारी व सप्त व्यसनाचा त्यागी असतो. मधाचा त्याग अष्ट मूलगुणात येतो.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

सुबोध – मूलगुण कशास म्हणतात व अष्ट मूलगुणात काय काय येते ?

प्रबोध – निश्चयाने तर समस्त परपदार्थांवरून दृष्टी–हटवून आपल्या आत्म्याची श्रद्धा, ज्ञान आणि स्थिरता हेच मुमुक्षु श्रावकाचे मूलगुण आहेत. परंतु व्यवहाराने मद्य–त्याग, मांस–त्याग, मधु–त्याग आणि पंच उदुम्बर फलांच्या त्यागालाच अष्ट मूलगुण म्हणतात.

सुबोध – मधु–त्याग तर मधाच्या त्यागाला म्हणतात. परंतु मद्य–त्याग कशास म्हणतात.

प्रबोध – दारू वगैरे मादक पदार्थांच्या सेवनाचा त्याग करणे हा मद्य–त्याग होय. मद्य (दारू) पदार्थांना सडवून तयार केले जाते म्हणून त्यामध्ये लाखो जीवांची उत्पत्ती होते. मद्यपानाने त्या सर्वांचा घात होतो, तसेच मद्य गुंगी (नशा) उत्पन्न करीत असल्यामुळे विवेक नष्ट होऊन मनुष्य बेभान (पागल) होतो. म्हणून म द्याचा त्याग करणे देखील अत्यंत आवश्यक आहे.

सुबोध – आणि मांस–त्याग का आवश्यक आहे ?

प्रबोध – त्रस जीवांचा घात होऊनच मांस उत्पन्न होते, तसेच मांसामध्ये निरंतर त्रस जीवांची उत्पत्ती देखील होत असते. म्हणून मांस खाणारा असंख्य त्रस जीवांचा घात करतो, त्याचे परिणाम क्रूर होतात. आत्महिताची इच्छा करणाऱ्यांनी मांस भक्षण कदापिही करू नये. अण्डी देखील त्रस जीवांचे शरीर असल्यामुळे मांसच आहे. म्हणून तीही खाऊ नयेत.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

**सुबोध** – आणि पाच उदुम्बर फळे ती कोणती ?

**प्रबोध**– वडाचे फळ, पिंपळाचे फळ, उमर (उंबराचे) फळ, कठूमराचे फळ आणि पाकर फळ या पाच जातीच्या फळांना उदुम्बर फळ म्हणतात. यामध्ये अनेक सूक्ष्म, स्थूल त्रसजीव असतात. म्हणून ही फळे सुद्धा कोणीही खाऊ नयेत.

**सुबोध**– मी प्रवचनात ऐकले होते की, आत्मज्ञानाशिवाय या सर्वांचा त्याग कार्यकारी नाही म्हणून आम्ही प्रथम आत्मज्ञान प्राप्त केले पाहिजे असेच ना ?

**प्रबोध**– बाळ ! आत्मज्ञान मुक्तीचा खरा मार्ग तर आहेच, परंतु हे तर सांगा, दारुबाज, मांसभक्षक यांना देखील आत्मज्ञान होऊ शकते काय ? म्हणून आत्मज्ञानाची इच्छा करणारे अष्ट मूलगुण धारण करीत असतात.

**प्रश्न**—

१. मद्य–त्याग, मांस–त्याग, आणि मधु–त्याग स्पष्ट करा.
२. पंच उदूम्बर फळे कोणकोणती आहेत आणि ती का खाऊ नयेत ?



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# पाठ चवथा

# इन्द्रिय

**मुलगी**– आई ! बाबांना ' जैन साहेब ' का म्हणतात ?

**आई** – जैन आहेत, म्हणून 'जैन' म्हणविले जातात. जिनाचा भक्त तो जैन अथवा जिन–आज्ञेला मानतो तो जैन. जिनदेवांनी दाखविलेल्या मार्गाने चालणाराच खरा जैन आहे.

**मुलगी**– आणि हे ' जिन' कोण आहेत ?

**आई** – ज्यांनी मोह–राग–द्वेष आणि इन्द्रियांना जिंकले तेच ' जिन ' होत.

**मुलगी**– तर काय इन्द्रिय आमचे शत्रु आहेत म्हणून त्यांना जिंकावयाचे आहे ? ती तर आमच्या ज्ञानात सहाय्यक आहेत. शरीराची जी चिन्हे आत्म्याला ज्ञान करण्यात सहायक आहेत तीच तर ' **इन्द्रिय** ' आहेत.

**आई** – होय मुली ! इन्द्रिय संसारी जीवाला ज्ञानाच्या वेळी देखील निमित्त होतात, पण दुसरे असेही आहे की, ती विषयांच्या भोगाला देखील निमित्त होतात. म्हणून यांना जिंकणाराच भगवान होऊ शकतो.

**मुलगी**– तर मग इन्द्रियांच्या भोगांना तेवढे सोडले पाहिजे, इन्द्रियज्ञानाला नाहीना ?



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

**आई** – **बाळ ! तुला माहीत आहे काय की, इन्द्रिय किती आहेत व ती कोणत्या ज्ञानात निमित्त आहेत ?**

**मुलगी**– होय ! ती पाच आहेत. स्पर्शन, रसना, घ्राण, चक्षु आणि कर्ण.

**आई** – छान ! तर मग सांग पाहू स्पर्शनेन्द्रिय कशास म्हणतात?

**मुलगी**– ज्याने स्पर्श केला असता हलका–भारी, रुक्ष–चिकट, कोमल–कठोर, थंड–गरम यांचे ज्ञान होते त्यास 'स्पर्शनेन्द्रिय' म्हणतात.

आई – बाळ ! जाणतो तर आत्माच ना ?

मुलगी– होय ! होय ! इन्द्रिय तर निमित्तमात्र आहेत. याच-प्रमाणे ज्यामुळे गोड, कडू आंबट, खारट व तुरट स्वाद जाणला जातो तेच **'रसनेन्द्रिय'** आहे. जीभेलाच रसना म्हणतात.

आई – आणि स्पर्शन् काय आहे ?

मुलगी– स्पर्शनेन्द्रिय तर सर्व शरीरच आहे आणि हो ! ज्याने आम्ही वास घेतो तेच नाक **'घ्राणेन्द्रिय'** आहे ते सुगंध आणि दुर्गंध याच्या ज्ञानात निमित्त आहे.

आई – आणि रंगाच्या ज्ञानात निमित्त कोण आहे.

मुलगी– डोळे ! यालाच चक्षु म्हणतात. ज्याने काळा, पांढरा, लाल, निळा, पिवळा आदि रंगाचे ज्ञान होते तेच तर चक्षुरिन्द्रिय आहे. आणि ज्यांनी आम्ही ऐकतो तेच कान **'कर्णेन्द्रिय'** आहेत अथवा यांना **'श्रोत्रेन्द्रिय'** म्हणतात.

आई – बाळ तू तर सर्व जाणतेस, परंतु हे तर सांग पाहू की, ही पाचही इन्द्रिये कोणत्या वस्तूला जाणण्यास निमित्त झाली आहेत ?

मुलगी– स्पर्श, रस, गंध, वर्ण आणि आवाज व शब्द यांना जाणण्यास निमित्त झाली.

आई – बरोबर स्पर्श, रस, गंध, वर्ण हे तर पुद्गलाचे गुण आहेत, म्हणून इन्द्रियांच्या निमित्ताने तर फक्त पुद्गलांचेच ज्ञान होते. आत्म्याचे ज्ञान तर होत नाही ?

मुलगी– आवाज व शब्दांचे देखील ज्ञान होतेच ना !

आई – बाळ ! शब्द देखील तर पुद्गलांचे पर्याय आहेत. आत्मा तर अमूर्तिक चेतन पदार्थ आहे. त्यामध्ये स्पर्श, रस, गंध, वर्ण आणि आवाज व शब्द नाहीतच. म्हणून इन्द्रिय आत्म्याला जाणण्यात निमित्त होऊ शकत नाहीत.

मुलगी– नाही तर नाही. ज्या कोणाला जाणण्यात निमित्त आहेत तेवढेच पुरे !

आई – बाळ ! असे म्हणून कसे बरे चालेल ? आत्म्याचे हित तर आत्म्याला जाणण्यात आहे. आणि इन्द्रिय तर आत्म्याला जाणण्यात निमित्त होत नाहीत. म्हणून इन्द्रियज्ञान देखील अगदीच तुच्छ (हीणकस) ठरते. ज्याप्रमाणे इन्द्रियसुख (भोग) हेय (त्याज्य) आहे, त्याचप्रमाणे केवळ दुसऱ्याला जाणणारे इन्द्रिय–ज्ञान देखील तुच्छ आहे आणि अतीन्द्रिय आनंद तसेच अतीन्द्रिय ज्ञान मात्र उपादेय आहे.

प्रश्न—

१. जैन कोणास म्हणतात ?
२. इन्द्रिय कशास म्हणतात, ती किती आहेत; नावे सांगा ?
३. इन्द्रिय कोणाला जाणण्यात निमित्त आहेत ?
४. इन्द्रिय केवळ जाणण्यामध्येच निमित्त आहेत काय ?
५. जर इन्द्रिय 'ज्ञानातच' केवळ निमित्त आहेत तर जाणणारा कोण!
६. इन्द्रियज्ञान का तुच्छ आहे ?

## पाठात आलेली सूत्रात्मक सिद्धांत-वाक्ये—

१. ज्यांनी मोह–राग–द्वेष आणि इन्द्रियांना जिंकले ते '**जिन**' होत.

२. जिनाचा भक्त किंवा जिन आज्ञेला जो मानतो तो '**जैन**' होय.

३. शरीराचे जे चिन्हविशेष संसारी जीवाला ज्ञान होण्यात निमित्त असतात त्यांना '**इन्द्रिय**' म्हणतात.

४. हलका–भारी, रुक्ष–चिकट, थंड–गरम आणि कोमल–कठोर यांचे ज्ञान होण्यामध्ये निमित्तरूप शरीर '**स्पर्शनेंद्रिय**' आहे.

५. गोड, कडू, खारट, तुरट आणि आंबट आदि स्वाद जाणण्यात निमित्तरूप जीभच '**रसनेंद्रिय**' आहे.

६. सुगंध आणि दुर्गंध जाणण्यात निमित्तरूप नाकच '**घ्राणेंद्रिय**' आहे.

७. रंगाच्या ज्ञानात निमित्तरूप डोळाच '**चक्षुरिंद्रिय**' आहे.

८. शब्दांच्या ज्ञानात निमित्तरूप कान हेच '**कर्णेंद्रिय**' आहे.

९ इन्द्रिय मात्र पुद्गलांच्या ज्ञानांतच निमित्त आहेत; आत्मज्ञानात नाहीत.

१०. इन्द्रिय सुखाप्रमाणे इन्द्रिय ज्ञान देखील तुच्छ आहे. अतीन्द्रिय सुख आणि अतीन्द्रिय ज्ञानच उपादेय आहे.

---

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# पाठ पाचवा

# सदाचार

## ( भक्ष्याभक्ष्य विचार )

सुबोध– काय प्रबोध ! कोठे चाललास ? चल; आज तर चौकात जाऊन मस्त बटाटावडा खाऊ ! फार दिवसापासून खाल्ला नाही.

प्रबोध– भर चौकात आणि बटाटावडा ! आपण बाजारामध्ये तर कोणतीही वस्तू खाऊ नये आणि बटाटावडा ही काय खाण्याची वस्तू आहे ? लक्षात नाही होय, काल गुरुजींनी सांगितले होते की बटाटा अभक्ष्य आहे !

सुबोध– अभक्ष्य म्हणजे आहे तरी काय ? माझ्या तर लक्षात येत नाही. पाठशाळेत पंडितजी सांगतात– हे खाऊ नये, ते खाऊ नये. औषधालयात वैद्यराज सांगतात– हे खाऊ नका, ते खाऊ नका. आपल्याला तर हे काही पसंत नाही. जे मनात येईल ते खावे आणि मस्त मजेत रहावे ! बरं ! पण हे भक्ष्य काय व अभक्ष्य काय एकदा सांगा तर पाहू ?

प्रबोध– जे खाण्यायोग्य आहे ते भक्ष्य व जे खाण्यायोग्य नाही ते अभक्ष्य. हेच तर ते सांगतात की आपल्या आत्म्याला एवढा पवित्र बनवा की अभक्ष्य खाण्याचा भाव



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

( इच्छा ) उत्पन्नच होणार नाही. जर पण्डितजी सांगतात की अभक्ष्य भक्षण करू नका तर ते आपल्या हिताचेंच सांगतात. कारण अभक्ष्य खाण्याने आणि अभक्ष्य खाण्याचे भाव (परिणाम) करण्याने आत्म्याचे पतनच होते.

सुबोध – तर कोणकोणते पदार्थ अभक्ष्य आहेत ?

प्रबोध – जे पदार्थ खाण्यामध्ये त्रस जीवांचा घात (हिंसा) होतो, व पुष्कळशा स्थावर जीवांचा घात होतो, तसेच जे पदार्थ उत्तम पुरुष उपयोगात आणत नाहीत अगर गुंगी आणणारे अथवा हानिकारक असतील ते सर्व अभक्ष्य आहेत. ते पाच प्रकारचे आहेत.

सुबोध – कोणकोणते ?

प्रबोध – १. त्रसघातयुक्त, २. बहुघातयुक्त, ३. अनुपसेव्य, ४. मादक, ५. अनिष्ट.

ज्या पदार्थांच्या खाण्यापिण्यामध्ये त्रस जीवांचा घात होतो, ते 'त्रसघातयुक्त' होत. जसे पंचउदुम्बर फळे. यात अनेक सूक्ष्म व स्थूल त्रस जीव असतात, ही फळे केव्हाही खाऊ नयेत.

ज्या पदार्थांच्या खाण्यापिण्यामध्ये अनंत, स्थावर जीवांचा घात होतो ते 'बहुघातयुक्त' होत. यात सर्व-प्रकारची कंदमुळे–बटाटा, गांजर, मुळा, कांदा, लसूण इत्यादी पदार्थ येतात. यामध्ये अनंत स्थावर निगोदी जीव असतात. या पदार्थांच्या उपयोगाने अनंत जीवांचा घात होतो, म्हणून आपण यांना सुद्धा कधीही खाऊ नये.

सुबोध – आणि अनुपसेव्य कशाला म्हणतात ?

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

**प्रबोध** – उत्तम पुरुष ज्या पदार्थांच्या उपयोगाला वाईट समजतात असे लोकनिंद्य पदार्थ 'अनुपसेव्य' होत. जसे लाळ, मल–मूत्र इत्यादी.

लोकनिंद्य अनुपसेव्य पदार्थ अभक्ष्य आहेत. तीव्र आसक्तीमुळेच खाणारे खातात म्हणून ते त्याज्यच आहेत.

**सुबोध** – आणि मादक अभक्ष्य ?

**प्रबोध** – ज्या वस्तूनी उन्माद येतो, असे पदार्थ 'मादक–अभक्ष्य' होत. जसे–दारू, अफू, गांजा, भांग, तंबाखु इत्यादी. म्हणून या पदार्थांचा सुद्धा त्याग करावयास हवा. प्रकृतीस हानिकारक पदार्थ 'अनिष्ट' होत. सर्व अनिष्ट पदार्थ अभक्ष्य आहेत. तीव्र–आसक्तीमुळेच अनिष्ट पदार्थ खाण्याचे भाव होतात म्हणून ते त्याज्य आहेत.

**सुबोध** – प्रबोध ! छान ! आजपासून मी कोणत्याही अभक्ष्याचे भक्षण करणार नाही अभक्ष्य–भक्षणाच्या महान् पातकापासून तू मला आज वाचविलेस. खरोखरच मी तुझा अत्यंत ऋणी आहे.

**प्रश्न**—

१. 'अभक्ष्य' म्हणजे काय ? ते किती प्रकारचे आहेत ?
२. 'अनुपसेव्य' कशाला म्हणतात ? त्यांच्या सेवनाने हिंसा कशी होते ?
३. ज्या पदार्थांच्या भक्षणामुळे 'बहुघात' होतो अशा चार पदार्थांची नावे सांगा ?
४. 'मादक अभक्ष्य' म्हणजे काय ?



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# पाठ सहावा

## द्रव्य–गुण–पर्याय

**विद्यार्थी** – गुरुजी ! आज वर्तमानपत्रात वाचले की, सध्या असे अणुबॉम्ब बनलेले आहेत की जर युद्धांत यांचा वापर झाला तर विश्वाचा नाश होईल.

**शिक्षक** – विश्वाचा कधी नाश होऊ शकतो काय ! विश्व तर सहा द्रव्यांच्या समूहाला म्हणतात; आणि द्रव्याचा तर कधी नाश होत नाही. केवळ त्याची पर्याय मात्र बदलत असते.

**विद्यार्थी** – विश्व तर द्रव्याच्या समूहाला म्हणतात आणि द्रव्य ?

**शिक्षक** – गुणांच्या समूहाला द्रव्य म्हणतात.

**विद्यार्थी** – मन्दिरामध्ये तत्त्वार्थसूत्र – प्रवचनाच्या वेळी, पंडितजींनी सांगितले की, द्रव्य तर गुण आणि पर्यायांनी युक्त असते. ( गुणपर्ययवद् द्रव्यम् । )

**शिक्षक** – बरोबर आहे ! दर समयाला गुणामध्ये होणाऱ्या परिवर्तनालाच पर्याय म्हणतात. म्हणूनच द्रव्याला गुणांचा समुदाय म्हणण्यात पर्याय येतोच.

**विद्यार्थी** – गुणांच्या परिणमनाला पर्याय म्हणतात, हे तर समजले, परंतु गुण कशास म्हणतात ?

**शिक्षक** – जो द्रव्याच्या संपूर्ण भागामध्ये व द्रव्याच्या संपूर्ण ( अवस्थेमध्ये ) पर्यायामध्ये राहतो त्यास गुण म्हणतात. जसे ज्ञान आत्म्याचा गुण आहे. हा गुण



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

आत्म्याच्या सर्व प्रदेशात व निगोदापासून मोक्षापर्यन्त होणाऱ्या आत्म्याच्या सर्व पर्यायांमध्ये राहतो म्हणूनच आत्म्याला ' ज्ञानमय ' असे म्हटलेले आहे.

विद्यार्थी – आत्म्यामध्ये असे किती गुण आहेत ?

शिक्षक – आत्म्यामध्ये ज्ञानाप्रमाणे अनंत गुण आहेत. आत्म्यामध्येच काय ! सर्व द्रव्यामध्ये–प्रत्येकामध्ये आपआपले वेगवेगळे अनंत अनंत गुण आहेत.

विद्यार्थी – तर मग आपला आत्मा म्हणजे अनंतगुणांचा भंडारच आहे !

शिक्षक – भंडाऽऽर ? आत्मा वेगळा व त्यांत गुण भरले आहेत असे थोडेच आहे ? तो तर गुणमय आहे. गुणांचा अखण्ड पिण्ड आहे. गुणपिण्ड आहे.

विद्यार्थी – ते अनंत गुण कोणकोणते आहेत ?

शिक्षक – असे कसे विचारतोस ! अरे अनंत काय मोजल्या जातात, किंवा सांगितल्या जातात ?

विद्यार्थी – त्यातील काही तर सांगा ?

शिक्षक – गुण दोन प्रकारचे असतात. सामान्यगुण आणि विशेषगुण जे सर्व द्रव्यात राहतात त्यांना **'सामान्यगुण'** म्हणतात व जे सर्व द्रव्यात न राहता आपापल्याच द्रव्यात राहतात त्यांना **' विशेषगुण '** म्हणतात.

जसे अस्तित्व गुण सर्व द्रव्यात आढळून येतो म्हणून तो सामान्यगुण होय व ज्ञानगुण फक्त जीव-द्रव्यातच असतो म्हणून तो जीव–द्रव्याचा विशेषगुण होय.

विद्यार्थी – सामान्यगुण किती आहेत ?

शिक्षक – अनेक आहेत. परंतु त्यात मुख्य सहा आहेत. अस्तित्व, वस्तुत्व, द्रव्यत्व, प्रमेयत्व, अगुरुलघुत्व आणि प्रदेशत्व.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

ज्या शक्तीच्या कारणाने द्रव्याचा कधीच नाश होत नाही त्यास अस्तित्वगुण म्हणतात. प्रत्येक द्रव्यात अस्तित्वगुण असतो. म्हणून प्रत्येक द्रव्याची सत्ता स्वयंसिद्ध आहे. म्हणूनच त्याला कोणी बनविलेलेही नाही आणि त्याचा नाशही कोणी करू शकत नाही. कारण ते अनादी–अनंत आहे.

या अस्तित्व गुणाच्या अपेक्षेनेच द्रव्याचे लक्षण 'सत्' असे केलेले आहे. सूत्रकारांनी म्हटलेच आहे की **'सत् द्रव्यलक्षणम्'** आणि 'सत्'चा कधीही विनाश होत नाही आणि त्याचप्रमाणे असत्‌चा कधीही उत्पाद होत नाही केवळ पर्याय बदलत असतो.

विद्यार्थी – आणि वस्तुत्व.... ?

शिक्षक – ज्या शक्तीच्या कारणाने द्रव्यात अर्थक्रियाकारित्व (प्रयोजनभूत क्रिया) असते त्यास वस्तुत्वगुण म्हणतात. वस्तुत्वगुणाच्या मुख्यतेनेच द्रव्याला **'वस्तु'** म्हटले आहे.

या लोकात कोणतीही वस्तु दुसऱ्याचे प्रयोजन सिद्ध करीत नाही, परंतु प्रत्येक वस्तु आपआपले प्रयोजनच सिद्ध करीत असते. कारण त्यामध्ये वस्तुत्वगुण आहे.

विद्यार्थी – द्रव्यत्वगुण कशास म्हणतात ?

शिक्षक – ज्या शक्तीच्या कारणाने द्रव्याचा पर्याय (अवस्था) निरंतर बदलत राहतो त्यास '**द्रव्यत्व**' गुण म्हणतात.

या गुणाच्या मुख्यतेनेच वस्तूला 'द्रव्य' म्हटले आहे. एका द्रव्याच्या परिवर्तनाचे कारण दुसरे कोणतेही द्रव्य नाही. कारण प्रत्येक द्रव्यामध्ये आपआपला द्रव्यत्वगुण वेगळा आहे. म्हणून द्रव्याच्या परिणमनामध्ये इतर द्रव्याची अपेक्षा नाही.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

विद्यार्थी – या तीन गुणांमध्ये काय अंतर आहे ?

शिक्षक – द्रव्यातील अस्तित्वगुण, द्रव्याची केवळ सत्ता (विद्यमानता) दाखवितो, वस्तुत्वगुण ते द्रव्य 'निरर्थक नाही' हे दाखवितो आणि द्रव्यत्वगुण ते द्रव्य 'निरंतर परिणमनशील आहे' हे दाखवितो.

विद्यार्थी – प्रमेयत्व गुण कशास म्हणतात ?

शिक्षक – ज्या शक्तीच्या कारणाने द्रव्य कोणत्या ना कोणत्या तरी ज्ञानाचा विषय बनते त्यास प्रमेयत्व गुण म्हणतात.

विद्यार्थी – काही वस्तू अत्यंत सूक्ष्म असतात त्या दिसत नसल्यामुळे आपल्या लक्षात येत नाहीत. जसे आपला आत्मा तो तर दिसतच नाही मग त्याला कसे बरे ओळखावे ?

शिक्षक – बाळ ! प्रत्येक द्रव्यात अशी शक्ती आहे, की ते अवश्य जाणले जातेच, परंतु ही गोष्ट वेगळी की ते इन्द्रिय–ज्ञानाने जाणता येणार नाही. याला कारण आपल्या ज्ञानाची दुर्बलता आहे. परंतु ज्याचे ज्ञान पूर्ण विकसित झाले आहे; म्हणजेच ज्यांना केवलज्ञान प्राप्त झाले आहे. त्यांच्या ज्ञानात (केवल ज्ञानात) सर्व काही प्रतिबिंबित होते आणि इतर ज्ञानामध्ये आपआपल्या योग्यतेला अनुसरून वस्तूचे ग्रहण होते म्हणून जगातील कोणताही पदार्थ अज्ञात राहू शकत नाही.

विद्यार्थी – अ ुरुलघुत्व गुण कशास म्हणतात ?

शिक्षक – ज्या शक्तीच्या कारणाने द्रव्यातील द्रव्यपणा कायम राहतो, म्हणजेच एकद्रव्य अन्यद्रव्यरूप होत नाही, एकगुण अन्यगुणरूप होत नाही आणि द्रव्यात असणारे अनंतगुण विखरून वेगवेगळे होत नाहीत त्यालाच अगुरुलघुत्व गुण म्हणतात.

विद्यार्थी – आणि प्रदेशत्व गुण.... ?

शिक्षक – ज्या शक्तीच्या कारगाने द्रव्याला कोणता तरी आकार अवश्य असतो त्याला प्रदेशत्व गुण म्हणतात.

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

विद्यार्थी – गुरुजी ! सामान्यगुण तर लक्षात आले. याचप्रमाणे विशेष गुणाबद्दलही काही सांगा ना?

शिक्षक – बाळ ! आपण पाहिले आहे ना ! जे सर्व द्रव्यामध्ये न राहता आपआपल्या द्रव्यातच राहतात ते विशेष-गुण होत. जसे जीव द्रव्यात ज्ञान, दर्शन, चारित्र, सुख इत्यादी. पुद्गलामध्ये स्पर्श, रस, गंध, वर्ण इत्यादी.

विद्यार्थी – गुरुजी ! हे तर सर्व झाले पण या द्रव्य-गुण पर्यायांच्या जाणण्यापासून लाभ काय ?

शिक्षक – लाभ कितीतरी मोठा आहे ! 'आपण सर्व तर जीव-द्रव्य आहोत आणि प्रत्येक द्रव्य गुणांचा पिण्ड आहे, म्हणून आम्ही सुद्धा गुणांचे पिण्ड आहोत' हे असे ज्ञान झाल्यानंतर 'आम्ही–दीन–गुणहीन आहोत' ही दुबळी मिथ्या भावना निघून जाते. तसेच 'आपणामध्ये अस्तित्वगुण आहे म्हणून आपला कोणीच नाश करू शकत नाही' असे ज्ञान झाले की, आमच्यात सहजच अनंत निर्भयता येते हा लाभ काय कमी झाला ?

ज्ञान आमचा गुण आहे– स्वभाव आहे. त्याचा कधीच नाश होत नाही. अज्ञान, रागद्वेष इत्यादी विपरीत भाव (विकारी पर्याय) आहेत. आपल्या स्वभावभावाचा अर्थात आत्म्याचा आश्रय केला की या विपरीत भावाचा अभाव होतो.

**प्रश्न—**

१. द्रव्य कशास म्हणतात ?

२. गुण कशास म्हणतात व ते किती प्रकारचे असतात ?

३. सामान्यगुण कशास म्हणतात व ते किती आहेत ? प्रत्येकाची व्याख्या सांगा ?

४. विशेषगुण कशास म्हणतात ? जीव व पुद्गलाचे विशेषगुण सांगा ?

५. पर्याय कशास म्हणतात ?

६. द्रव्य–गुण–पर्यायांना जाणल्यापासून काय लाभ होतो ?



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# पाठ सातवा

# भगवान नेमिनाथ

**बहिण** – दादा ! भगवान नेमिनाथ आपल्या शोकमग्न पत्नी राजुलला एकटी सोडून निघून गेले होते ना ?

**भाऊ** – ताई ! भगवान नेमिनाथ तर बालब्रह्मचारी होते. त्यांचे लग्नसुद्धा झालेले नव्हते. म्हणून पत्नीला सोडून जाण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही.

**बहिण** – मग लोक असे का म्हणतात ?

**भाऊ** – खरी गोष्ट अशी आहे की, नेमिकुमार जेव्हा राजकुमार होते तेव्हा त्यांचा सोयरीक–संबंध जुनागढचे राजे उग्रसेन यांची कन्या राजूलशी ठरला होता. नेमिकुमारांच्या लग्नाची वरात जात होती. मार्गामध्ये मरणासन्न असहाय मूक पशू दृष्टीला पडले; संसारातील स्वार्थीपणा व क्रूरपणा नेमिनाथांच्या लक्षात आला. ते तत्काळ संसार व भोगोपभोगापासून विरक्त झाले. ते आत्मज्ञानी तर होतेच. ते वरात सोडून निघाले त्याच-वेळी आई–वडील धन–धान्य, राज्य इत्यादी संपूर्ण बाह्य–परिग्रहांचा त्याग केला. व राग–द्वेष या अंतरंग–परिग्रहांनाही सोडले. ते नग्न दिगंबर साधु झाले. आणि गिरनार पर्वताकडे गेले.

यामुळेच लोक म्हणतात की, ते पत्नी राजुलला सोडून गेले.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

बहिण – नेमिनाथ तर निघून गेले मग राजुलचे लग्न ?

भाऊ – नाही ताई ! राजुलपुद्धा तत्त्वप्रेमी राजकुमारी होती. वरील घटनेचे निमित्त मिळाले, राजुल देखील विरक्त झाली. मातापित्यांनी तिला पुष्कळ सांगितले पण ती लग्नाकरिता तयार झाली नाही.

बहिण – हे तर फारच वाईट झाले !

भाऊ – यात वाईट काय झाले ? रागभाव सोडणे व वीतरागतेकडे वळणे हे तर चांगले आहे.

बहिण – मग काय ती जीवनभर वडीलांकडे राहिली ?

भाऊ – नाही ताई ! राजुल जीवनभर वडीलांच्या घरी राहिली नाही ! तिला वैराग्य तर झालेच होते. तिने संसारभोगाची असारता पुरेपूर ओळखली होती. तिला राग द्वेष विकारांनी रहित ज्ञानानंद स्वभावी अशा आत्म्याचा अनुभव आला होता. आर्यिकेची व्रते धारण करून, आर्यिका राजमती आत्मसाधनेत लीन झाली.

बहिण – हे नेमिनाथ कोण होते ?

भाऊ – हे सौरीपुरचे राजा समुद्रविजयाचे पुत्र होते. त्यांच्या आईचे नाव शिवादेवी होते. हे श्रीकृष्णाचे चुलतभाऊ होते. हे बावीसावे तीर्थंकर होते. इतर तीर्थंकरांप्रमाणे यांचाही जन्मकल्याणिक महोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा झाला.

नेमिनाथांचे आत्मबळ अपूर्व तर होतेच. पण शरीरबलसुद्धा अतुल्य होते. नेमिनाथांनी राजपाट व विषयभोगांचा त्याग केला. त्यांनी गिरनारच्या गुंफेमध्ये राहून शांतिपूर्वक आत्मसाधना करण्याचे ध्येय निश्चित केले. संपूर्ण संसारापासून आपल्या उपयोग



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

परिणतीला दूर केले. एकमात्र ज्ञानानंद–स्वभावी आपल्या आत्म्यामध्ये लावले. ते आत्मज्ञानी तर प्रारंभापासून होतेच, आता आत्मस्वरूपामधील स्थिरतारूप चारित्राच्या वरवरच्या श्रेणींवर चढू लागले. दीक्षेच्या नंतर अवघ्या ५६ दिवसातच त्यांनी क्षपक श्रेणीवर आरोहण केले व आत्मसाधनेच्या अंतिम परिणतीला-केवलज्ञानाला प्राप्त झाले. त्यानंतर जवळ जवळ ७०० वर्षे भगवान नेमिनाथांचा समवशरण सहित भारताच्या सर्व भागामध्ये विहार होत राहिला व विहारामध्ये दिव्यध्वनीद्वारे तत्त्वांचा प्रसार होत राहिला.

सरतेशेवटी भगवंतांचे एक हजार वर्षांचे आयुष्य येथेच पूर्ण झाले. गिरनार पर्वताहून त्यांनी मुक्ती प्राप्त केली.

**बहिण** – म्हणूनच गिरनारजी सिद्धक्षेत्र झाले, असेच ना !

भाऊ – होय ! गिरनारपर्वत भगवान नेमिनाथांची केवळ निर्वाणभूमीच आहे असे मात्र नाही. ती तपोभूमीही आहे. आर्यिका राजमतींनी सुद्धा येथेच तपस्या केली.

श्रीकृष्णाचे सुपुत्र प्रद्युम्नकुमार व शम्बुकुमार यांनाही येथेच मुक्तीची प्राप्ती झाली आहे.

संपूर्ण जैन समाज शिखरजीप्रमाणेच गिरी गिरनार सिद्धक्षेत्राला देखील तितक्याच भक्तिभावाने व आदराने पूज्य समजतो.

**प्रश्न—**

१. **भगवान नेमिनाथांचा थोडक्यात जीवन परिचय द्या.**

२. **सिद्धक्षेत्र गिरनारची संक्षिप्त माहिती द्या.**

---

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates


# पाठ आठवा

# जिनवाणी-स्तुती

वीर हिमाचलतैं निकसी, गुरु गौतम के मुख कुंड ढरी है।
मोह महाचल भेद चली, जग की जड़तातप दूर करी है।।
ज्ञान पयोनिधि माँहि रली, बहु भंग तरंगनिसों उछरी है।
ता शुचि शारद गंग नदी प्रति, मैं अंजुलिकर शीश धरी है।।१।।
या जगमंदिर में अनिवार, अज्ञान अंधेर छयो अति भारी।
श्री जिन की धुनि दीपशिखा सम, जो नहिं होत प्रकाशन-हारी।।
तो किस भांति पदारथ पाँति, कहाँ लहते रहते अविचारी।
या विधि संत कहें धनि हैं, धनि है जिन वैन बडे उपकारी।।२।।

## (भाव-ग्रहण)

ही परोपकारी जिनवाणी पाप क्षालनासाठी गंगेप्रमाणे व अज्ञान अंधःकाराचा नाश करण्यासाठी दीपज्योतीप्रमाणे






Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

निमित्त आहे. हे लक्षात घेऊन या स्तुतीमध्ये जिनवाणीला नमस्कार केला आहे.

जिनवाणी अर्थात जिनेंद्र भगवंतांनी दिलेला तत्त्वोपदेश अथवा प्रगट झालेला मुक्तिसुखाचा मार्ग.

जिनवाणी ! मातेसरस्वती ! वाग्गंगे ! उंच हिमालया-प्रमाणे सर्वश्रेष्ठ भगवान महावीरांपासून तू प्रवाहित होऊन गौतमगणधरांच्या मुख कुंडामध्ये अवतरित झालीस !

मध्यंतरी येणाऱ्या मोहरूपी मोठमोठ्या पर्वतांचा भेद करीत करीत आपल्या पूरप्रवाहाने विश्वाच्या अज्ञान आणि दुःखाला तू दूर करीत आहेस !

आई ! सप्तभंगरूप नयतरंगांनी निसर्ग निर्मल ज्ञानाच्या महासागरामध्ये दूर-दूरवर तू प्रवाहित झाली आहेस ! परम-पवित्र शारदामाते गंगे ! माझी अल्पबुद्धी व अल्पशक्ती यांना अनुसरून नम्र भावाने मी तुला मस्तक नम्र करून दोन्ही हात जोडून नमन करीत आहे !

देवी सरस्वती ! या विशाल विश्वमंदिरामध्ये अज्ञानरूपी घोर अंधःकार सर्वत्र व्यापून आहे. या अज्ञान अंधःकाराला दूर सारून सर्वत्र प्रकाश करणारी जिनवाणीची दीपज्योत नसती तर जगातील जीवात्मे पदार्थांच्या यथार्थ स्वरूपाला कसे प्राप्त झाले असते ? तत्त्व विचार जसाचा तसाच-अविचारित-गूढ राहिला असता. म्हणून तर विचारशील सर्व सन्त महन्त एकमुखाने तुझे गुणगान करतात. देवी सरस्वती ! तू खरोखरीच धन्य आहेस !

माते जिनवाणी तुला वारंवार नमस्कार असो !

**प्रश्न—**

१. जिनवाणी स्तुतीच्या कोणत्याही चार ओळी अर्थासहित लिहा.

---



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com